*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XI / Issue – IV* *ISSN 2277-8063*

# कोल्हापूर जिल्हयातील जलक्रांतीचे प्रणेतेः छत्रपती शाहू महाराज

**प्रा. कुबेर दिनकर दिंडे** M.A. B.Ed. SET. NET.(Economics) मु.पो.बहिरेश्वर, ता. करवीर जि. कोल्हापूर मो.7263937009 Email- kuberdinde1979@gmail.com

---

1) प्रस्तावनाः

भारतातील ब्रिटिशांच्या राजवटीच्या काळात जी 601 संस्थाने होती त्या 601 संस्थानांपैकी कोल्हापूर संस्थानचे नाव आजही अतिशय आदराने आणि सन्मानपूर्वक घेतले जाते.त्याचे कारण या कोल्हापूर संस्थानंला 1884 ते 1922 या काळात लाभलेले छत्रपती शाहू महाराज यांचे नेतृत्व होय. छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म 26 जुलै1874 कोल्हापूर येथे झाला. आणि 17मार्च1884 रोजी कोल्हापूर संस्थानांला त्यांचा दत्तक विधी समारंभ झाला. छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार 28 वर्शे अतिशय दक्षतेने आणि ' राजा हा उपभोगशून्य स्वामी या भावनेतून केला. 2एप्रिल 1894 रोजी ते अधिकारपदावर आले त्यावेळेला सर्वप्रथम त्यांनी आपल्या संस्थानची पाहणी केली पाहणी करण्यापाठीमागे त्यांचा हेतू हा होता की प्रजेची परिस्थिती समजून घ्यावी. परंतू या संस्थानच्या दौऱ्यामुळे राजा आणि प्रजा यांच्यामध्ये एक जिव्हाळ्याची भावना निर्माण झाली. गारगोटी,भुदरगड, पन्हाळा,गडहिंग्लज, कटकोळ इत्यादी पेठ्यातील गावांची महाराजानी पाहणी केली. पाहणीमध्ये महाराजांना असे आढळून आले की संस्थानच्या ग्रामीण भागात,अनेक गावात पाण्याच्या बाबतीत खूपच वाईट अवस्था आहे. त्यामुळे लोकांचे खूपच हाल होत आहेत त्यातच जातीव्यवस्थेचा ही प्रश्न होताच या पाण्याच्या समस्येमध्ये पिण्याच्या आणि शेतीच्या अशा

दोन्ही प्रकारच्या समस्या होत्या आणि या दोन समस्यांची तीव्रताही खूपच होती जेव्हा शाहू महाराजांना या पाण्याच्या समस्येची तीव्रता जाणवली तेव्हा त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत पाण्याच्या उपलब्धतेसाठी भर दिलेला आहे.

2)उद्दिष्टेः

1. छत्रपती शाहू महाराजांच्या जलसिंचन विषयक विचारांचा अभ्यास करणे
2 छत्रपती शाहू महाराजांनी जलसिंचन विषयक केलेल्या सुधारणांचा किंवा कार्यांचा अभ्यास करणे
3 छत्रपती शाहू महाराजांनी जलसिंचन विषयक केलेल्या सुधारणांचा किंवा कार्यांमुळे कोल्हापूर जिल्हयात झालेल्या जलक्रांतीचा अभ्यास करणे.

3) संशोधन पद्धती : सदरशोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम सामग्रीचा आधार घेतलेला आहे.

4) छत्रपती शाहू महाराजांचे जलसिंचन विषयक कार्य :

अ)कोल्हापूर संस्थानातील विहीरी, तलाव आणि जलसिंचन क्षेत्रः छत्रपती शाहू महाराजांच्या काळात विहीरी, तलाव हा जलसिंचनाचा प्रमुख स्रोत होता. त्या काळात संस्थानात कच्या व पक्क्या विहीरींची निर्मिती व दुरूस्ती करण्याचे काम शाहू महाराजांनी अग्रक्रमाने केले. संस्थानातील लोकांना शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा हा उद्देशदेखील त्यानी विहीरींच्या माध्यमातून जोपासलेला होता. 1906–07 साली कोल्हापूर संस्थानात एकूण 12050 विहीरी होत्या हे प्रमाण 1921–1922 मध्ये 12057 पर्यंत वाढल्याचे दिसून येते. थोडक्यात शाहू महाराजांनी नविन विहीरी बांधण्यापेक्षा अस्तित्वातीलच विहीरींना पुनरूज्जीवन देण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले होते.

कोल्हापूर संस्थानात तलावांची संख्या पूर्वीपासूनच अधिक होती. कळंबा, रंकाळा,बहिरेश्वर इत्यादी अस्तित्वातील तलावांची खोली वाढवणे, त्यांची बांधणी करणे तसेच काही तलावांची नव्याने निर्मिती करण्याचे काम शाहू महाराजांनी केले होते यामध्ये शिरोळ, वडगाव, रुकडी अतिग्रे, सातवे आणि रंकाळा इत्यादी मोठ्या तलावांचे काम हाती घेतले.

1906–1907 मध्ये विहीरी, तलाव, नदी व तलावांच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानातील एकूण 24000 एकर जमिन जलसिंचनाखाली होती हेच प्रमाण सातत्याने वाढत जाऊन 1921–1922 मध्ये 27000 एकर जमिन इतके झाले होते. थोडक्यात शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानात योग्य पाणी व्यवस्थापनाद्वारे संस्थानाचे जलसिंचन क्षेत्र वाढल्याचे दिसून येते.

आ)पाणी व्यवस्थापन : शेती हा मान्सून पावसाचा जुगार आहे हे शाहू महाराजांनी ओळखले होते. संस्थानात जर शेतीचा विकास घडवून आणावयाचा असेल तर शेतीला पाण्याची जोड दिल्याशिवाय ते शक्य होणार नाही हे लक्ष्यात घेवून महाराजांनी 1902 साली संपूर्ण संस्थानचा जलसिंचनाचा आढावी (इरिगेशन सर्व्हे) तज्ञांकडून करुन घेतला

होता. महाराजांनी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच म्हणजे 1894 पासूनच त्यांनी संस्थानात जलसिंचन सुविधांचा प्रारंभ केला होता. संस्थानातील जास्तीत जास्त जमिन ओलिताखाली आणण्यासाठी महाराजांनी संस्थानात अनेक2 ठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, वेगवगळे तलाव व विहीरी यांची दुरुस्ती आणि शक्य असेल तर नविन बांधणीही त्यांनी हाती घेतली त्यांतच संस्थानात 1896–1897, 1899–1900, 1918–1919 या तीन वर्षात मोठे दुष्काळ पडले. पहिल्या दोन दुष्काळातील वाईट अनुभव लक्षात घेता दुश्काळावर मात करण्यासाठी तात्पुरती व अल्पजीवी उपाययोजना उपयुक्त ठरत नाही हे जाणून महाराजांनी त्या काळातील पाण्याशी संबधित सर्वात महत्वाची योजना हाती घेतली ज्यामुळे कोल्हापूर संस्थानचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवला जावून शेतीचा विकास मोठ्या प्रमाणात घडवून आणणे शक्य झाले.आणि ही योजना म्हणजे “ राधानगरी धरण ” होय. या प्रकल्पावरील खर्चाव्यतिरीक्त इतर जलसिंचन सुविधावर महाराजांनी प्रतिवर्षी सरासरी 75,960रु. खर्च केल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसून येते.

इ)राधानगरी धरणः

संस्थानातील सर्व जलसिंचन सुविधांचा सोनेरी कळस म्हणजे ‘राधानगरी धरण’ होय. महाराजांनी 1902 सालच्या युरोप दौऱ्यातून या धरणाची कल्पना सुचली जलसिंचन सुविधाद्वारे युरोपमध्ये झालेली प्रगती महाराजांनी प्रत्यक्षपणे पाहीली होती. त्यामुळे या युरोप दौऱ्यानंतर जवळजवळ 5 वर्षे विचार करुन महाराजांनी भोगावती नदीवर हा प्रकल्प बांधण्याचे निश्चित केले आणि आपल्या सौभाग्यवती लक्ष्मीबाई यांच्या शुभहस्ते 1909 साली धरणाचा पाया खुदाई समारंभ झाला. संस्थानाच्या कुवतीपेक्षा कितीतरी अधिक असा धरणाचा खर्च असूनदेखील संस्थानच्या भविष्यकालीन विकासाचा वेध घेवून महाराजांनी हा प्रकल्प सुरु केला. या प्रकल्पाच्या बांधणीत महाराजांना आर्थिक व त्याहीपेक्षा मानसिक त्रास सहन करावा लागला तरीदेखील महारांजानी या प्रकल्पाचे काम सुरुच ठेवले. कारण या प्रकल्पामुळे संपूर्ण संस्थानचा पाण्याचा प्रश्न कायमचा संपणार होता. पुढे पहिल्या महायद्धामुळे ब्रिटिशांना निधी द्यावा लागला त्यामुळे धरणावरील वाढता खर्च करणे शक्य होईना त्यामुळे नाइलाजाने 1917 साली धरणाचे काम बंद करावे लागले तोपर्यंत धरणाचे बांधकाम 43,86,088 घनफूट झालेले होते तर 13,36,160 एवढा प्रचंड खर्च झालेला होता. पुढे शाहू महाराजांचे हे कार्य त्यांचे चिरंजीव राजाराम महाराजांनी 1957 साली पूर्ण केले या धरणामुळेच कोल्हापूर जिल्हयात हरीत आणि जलक्रांती झाली आहे.

5) निष्कर्ष :

इंग्रजाच्या साम्राज्यवादी राज्यव्यवस्थेत इंग्रजांची करडी नजर असलेल्या एका संस्थानचे प्रमुख ही शाहू महारांजांची मर्यादा होती, 3217चौ.कि.मी. हा संस्थानचा आकार,साडेआठ ते नऊ लाखांची तेव्हाची लोकसंख्या आणि 4 टक्क्यांच्या आसपास साक्षरतेचे प्रमाण, उद्योगांचा अभाव, मागासलेली शेती हयाही त्यावेळच्या मर्यादा होत्या. त्या काळात लोकशाही , समाजवाद,सामाजिक न्याय,लोककल्याणकारी शासनसंस्था या संकल्पना अस्तित्वातही नव्हत्या.त्यामुळे त्या काळात शाहू महाराजानी केलेजे कार्य अद्वितीय ठरते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य, राज्य,धनसंपत्ती ही आपल्या प्रजेसाठी खर्च केली. त्यांच्या सर्व प्रकारच्या कार्यात 1894 ते 1922 या काळात कोल्हापूर संस्थानात झालेला पाण्यावरील खर्च लक्षात घेता तो एकूण 21,26,889 एवढा होता. विशेष म्हणजे हा खर्च संस्थानातील सर्व प्रकारच्या त्या काळातील सार्वजनिक कामांच्या खर्चाच्या 18.33 टक्के इतका होता शाहू महाराजांनी आपल्या कार्याचा सर्वाधिक भर हा कोल्हापूर संस्थानातील पाणी उपलब्धतेवर दिला होता. आणि त्याचाच परिणाम म्हणून आज कोल्हापूर हा जिल्हा पाण्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण आहे म्हणून त्यांचे कार्य बघता छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर जिल्हयातील जलक्रांतीचे प्रणेते ठरतात.

6)संदर्भ ग्रंथः

1) शाहूंच्या आठवणी,प्रा.नानासाहेब सांळुखे, वृशाली प्रकाशन, कोल्हापूर.
2) अर्थायन, प्रा.डॉ. जे.के.पवार,राज प्रकाशन, कोल्हापूर
3) राजर्षी शाहू महाराज प्राचार्य रा.तु.भगत, रिया पब्लीकेशन, कोल्हापूर
4)राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानकालीन संदर्भ, डॉ. आर. एन. करपे सिध्दराज प्रकाशन पुणे
5)राजर्षी शाहू महाराज व माणूस, डॉ. विलास संगवे, ठोकळ प्रकाशन , पुणे.